Estd 1962
Naac 'A+++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.८/२/२०२२

## दि.९ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित मॉक टेस्टबाबत

विद्यापीठाकडील आयोजित सर्व परीक्षार्थी विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/ नोव्हेंबर २०२१ (हिवाळी सत्राच्या) परीक्षा दि.१४ फेब्रुवारी २०२२ पासून सुरु होणार आहेत. याबाबतचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे. हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा या ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. या अनुषंगाने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांसाठी सूचना व ऑनलाईन संगणकप्रणालीचा डेमो व्हिडीओ ठेवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी तो पहावा. दि.८ फेब्रुवारी २०२२ रोजी दुपारी १२.३० ते २.३० या कालावधीत मॉक टेस्टचे आयोजन करण्यात आले होते तथापि दि.८ फेब्रुवारी रोजी दुपारी १२.३० ते २.३० या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या मॉक टेस्टमध्ये **काही तांत्रिक अडचणीमुळे ब—याच परीक्षार्थींना मॉक टेस्ट देता आली नाही अशा परीक्षार्थी विद्यार्थ्यांची मॉक टेस्ट दि.९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० दरम्यान आयोजित करण्यात येत आहे.** तसेच यासाठीचा युजर आयडी व पासवर्ड विद्यार्थ्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल व मोबाईलवर एसएमएस द्वारे पाठविण्यात आला आहे. ज्या विद्यार्थ्यांना युजर आयडी व पासवर्ड प्राप्त झालेला नाही अशा विद्यार्थ्यांनी **https://suk.brainzorg.com** या लिंकवर जावून **"Get Your Password"** हा पर्याय निवडून आपला पासवर्ड उपलब्ध करुन घेता येईल. तसेच तांत्रिक अडचणीसाठी विद्यापीठाच्या कॉल सेंटर/हेल्प लाईन क्रमांक ८९८०००१२४९ यावर संपर्क साधावा. तरी मुख्य परीक्षेमध्ये कोणतीही तांत्रिक अडचण होवू नये यासाठी विद्यापीठाकडील परीक्षेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी सदरची मॉकटेस्ट देणे बंधनकारक आहे, याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, याची नोंद सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी केले आहे.